## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३१ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात माजी विद्यार्थी मेळाव्याचे विद्यापीठाच्या अधिसभागृहात आयोजन आज दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, माजी विद्यार्थी गोवा ऑलमाईल्स कंपनीचे संस्थापक उत्कर्ष दाभाडे, बी.ए.एस.एफ. इंडिया कंपनीचे मुख्य व्यवस्थापक अरविंद देशमुख, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालक प्रा. भूषण चौधरी, कार्यक्रमाच्या समन्वयक किर्ती कमळजा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उत्कर्ष दाभाडे म्हणाले की, ध्येय हे नेहमी उद्देशीत असणे गरजेचे असून तोच उद्देश माणसाला यशस्वी बनवतो, असे सांगत त्यांनी कर्मयोगाचा संदेश दिला. "कर्म केल्याशिवाय फळ मिळत नाही," या गीतेतील तत्त्वाचा उल्लेख करत त्यांनी स्वप्नपूर्तीचे महत्त्व अधोरेखित केले. स्वप्न पाहणे सोपे असते; मात्र ती स्वप्ने इतरांच्या मनात रुजवणे कठीण असते, असे मत त्यांनी व्यक्त केले. शब्दांची निवड आणि अभिव्यक्ती प्रभावी होण्यासाठी वाचन आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी विविध कादंबऱ्या व साहित्य वाचण्याचे आवाहन केले. उत्कर्ष दाभाडे यांच्या या अनुभवकथनाने उपस्थितांना नवी प्रेरणा व आत्मविश्वास दिला. यावेळी विद्यापीठाला त्यांनी प्रत्येक वर्षाला १ लाख रुपये देणगी जाहीर केली.

कार्यक्रमात बोलताना अरविंद देशमुख यांनी केमिकल उद्योगातील गेल्या २५ वर्षात झालेल्या मोठ्या बदलांकडे लक्ष वेधले. फार्मा, सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत असून, या बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी स्वतःला सतत अपडेट ठेवून नवी कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी म्हणाले की, आज उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी आपल्या आयुष्यातील सुवर्ण क्षण या विद्यापीठात व्यतित केले असून, त्या आठवणी आणि अनुभव ते आज शेअर करत आहेत. यावर्षी ३०० पेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. माजी विद्यार्थ्यांचे व्यावसायिक अनुभव व विविध क्षेत्रांतील मार्गदर्शन हे सध्याच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी प्रेरणादायी ठरते, असे त्यांनी नमूद करत विद्यापीठाच्या वाटचाली संदर्भात माहिती दिली. सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा परिसर अधिक चैतन्यशील बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. किर्ती कमळजा यांनी केले. विद्यापीठातील मोठ्या संख्येने माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्यासाठी नोंदणी केली होती. यात महाराष्ट्र तसेच दिल्ली, हैदराबाद, चेन्नई विविध राज्यातून तर काही विद्यार्थी देशभरातून आले होते. कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. प्रा. आर. आर. चव्हाण, प्रा. जितेंद्र नारखेडे, प्रा. आशा जंगले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विणा महाजन यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. आर. आर. चव्हाण यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३१ : भौतिकशास्त्र प्रशाळेत दि. १ जानेवारी, २०२६ रोजी मायक्रो कंट्रोलर्स व सेन्सर्सचे इंटरफेसिंग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे Hands-On आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक विभागातील ४० पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेचे संकल्पनाकार व मार्गदर्शक म्हणून युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, यूके येथील प्राध्यापक तथा भौतिकशास्त्र प्रशाळेचे अंडजंक्ट फैकल्टी डॉ. समाधान पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना मायक्रो कंट्रोलर्स व विविध सेन्सर्सचे प्रत्यक्ष ज्ञान देऊन सैध्दांतिक व व्यावहारिक ज्ञानातील दरी कमी करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेची सुरुवात प्रशाळेचे संचालक प्रा. जयदीप साळी यांच्या प्रस्तावनाने झाली. त्यानंतर डॉ. समाधान पाटील यांनी आधुनिक विज्ञान व औद्योगिक क्षेत्र या विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. पुढे IoT प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मायक्रो कंट्रोलर डेव्हलपमेंट बोर्ड, सेन्सर्स व आवश्यक इंटरफेसिंग घटक उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी सेन्सर्स जोडणे, मूलभूत प्रोग्राम लिहिणे, कोड अपलोड करणे व रिअल-टाइम डेटा निरीक्षण करण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. तसेच डीबगिंग तंत्रे व हार्डवेअर-सॉफ्टवेअर एकत्रीकरणातील अडचणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रासाठी डॉ. राहुल साळुंखे व अनिकेत पाठक यांनी तांत्रिक तज्ज्ञ म्हणून काम पाहिले. एम. एस. नेतकर, कु. वैष्णवी पाटील व कु. अबोली वाणी यांनी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना सहाय्य केले. डॉ. डी. जे. शिराळे, इलेक्ट्रॉनिक विभागप्रमुख, प्रा. संजय घोष भौतिकशास्त्र विभागप्रमुख व डॉ. पी. जी. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. समारोपाच्या सत्रात विद्यार्थ्यांनी कार्यशाळेबाबत समाधान व्यक्त करत एम्बेडेड सिस्टीम्स क्षेत्रात प्रकल्पाधारित शिक्षण व संशोधनाची प्रेरणा मिळाल्याचे नमूद केले. डॉ. डी.जे. शिराळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३१ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भौतिकशास्त्र प्रशाळेतील इलेक्ट्रॉनिक्स विभाग व प्रताप कॉलेज, अमळनेर येथील इलेक्ट्रॉनिक्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 20 ते 24 जानेवारी 2026 या कालावधीत

प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (PLC) विषयावर पाच दिवसीय हँड्स-ऑन कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेस RUSA, मुंबई यांचे अर्थसहाय्य लाभले. औद्योगिक स्वयंचलन (Industrial Automation) व PLC आधारित नियंत्रण प्रणालींचे सखोल सैद्धांतिक ज्ञान व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक अनुभव देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेचा पहिला दिवशी औद्योगिक स्वयंचलनाची गरज, उपयोग व फायदे, PLC चा संक्षिप्त इतिहास तसेच PLC प्रणालींचे कार्यपद्धतीचे सादरीकरण करण्यात आले. सहभागींचा उत्साह वाढविण्यासाठी पहिल्या दिवशी आकस्मिक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. दुसऱ्या दिवशी ऑटोमेशनमधील इनपुट-आउटपुट घटकांवर सत्रे घेण्यात आली. यामध्ये प्रॉक्सिमिटी व फोटोइलेक्ट्रिक सेन्सर्स, एन्कोडर्स, लेव्हल, फ्लो व तापमान सेन्सर्स तसेच मोटर्स, न्यूमॅटिक व हायड्रॉलिक अॅक्च्युएटर्स यांचा समावेश होता. दुपारच्या सत्रात Delta PLC ची ओळख, CPU, पॉवर सप्लाय, I/O मॉड्युल्स, स्कॅन सायकल व मेमरी संरचना याबाबत माहिती देण्यात आली. यानंतर आकस्मिक परस्परसंवादी खेळ आयोजित करण्यात आले.

तिसऱ्या दिवशी सहभागींस PLC प्रोग्रामिंगची ओळख करून देण्यात आली. यामध्ये Delta WPLSoft / ISPSoft सॉफ्टवेअरची स्थापना, प्रोजेक्ट सेट-अप, बिट इन्स्ट्रक्शन्स, टायमर व काउंटर, लॅडर लॉजिकची मूलतत्त्वे, PLC अॅड्रेसिंग व I/O इंटरफेसिंग यांचा समावेश होता. या दिवशीही आकस्मिक परस्परसंवादी खेळ घेण्यात आले.

चौथ्या दिवशी प्रत्यक्ष PLC प्रोग्रामिंगवरील हँड्स-ऑन प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये लॅडर प्रोग्राम्स, टायमर-काउंटर आधारित अनुप्रयोग, सेन्सर इंटरफेसिंग व मोटर कंट्रोल यांचा समावेश होता. याशिवाय एम्बेडेड सिस्टिम्सची ओळख करून देत ESP32 वर प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. सहभागींच्या विश्लेषणात्मक व संघभावना कौशल्यांचा विकास करण्यासाठी आकस्मिक ट्रेझर हंट आयोजित करण्यात आली.

पाचव्या व अंतिम दिवशी कन्वेयर कंट्रोल, ट्रॅफिक सिग्नल कंट्रोल व बाटली भरणे प्रणाली अशा मिनी प्रकल्पांवर काम करण्यात आले. प्रकल्पांची चाचणी, दोष निदान, ट्रबलशूटिंग व अंतिम सादरीकरण करण्यात आले. समारोप सत्रात सहभागींचा अभिप्राय घेण्यात आला, बक्षीस वितरण करण्यात आले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. डी. जे. शिराळे (प्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स विभाग) यांनी कार्य पाहिले. कार्यशाळेतील संपूर्ण सैद्धांतिक भाग डॉ. जे. पी. बंगे यांनी मार्गदर्शित केला. तसेच डॉ. आर. एस. साळुंके, श्री. अनिकेत पाठक, कु. वैष्णवी पाटील, कु. अबोली वाणी व एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सचे विद्यार्थी यांनी कार्यशाळेदरम्यान प्रात्यक्षिक प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्य पुरविले.

एकूणच, सदर कार्यशाळेमुळे सहभागींची तांत्रिक क्षमता, प्रात्यक्षिक कौशल्ये व PLC आधारित औद्योगिक स्वयंचलनाबाबतची समज लक्षणीयरीत्या वाढली आणि ही कार्यशाळा एक अत्यंत यशस्वी व प्रभावी शैक्षणिक उपक्रम ठरली.

**बातमी नं. ४**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३१ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील दोन अधिकारी व दोन कर्मचारी विद्यापीठ सेवेतून दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले.

विद्यापीठाच्या संलग्नता विभागातील उपकुलसचिव श्रीमती सविता सोनकांबळे, परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव सुनील हतागडे, बांधकाम विभागातील लघुलेखक (उ.श्रे.) रूपेश धुमाळ, वित्त विभागातील वरीष्ठ सहायक सुनील राजपुत हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील,वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३१ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता